## निशाण क्र. ५ वरील आदेश

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कलम २३ अन्वये सामनेवाला याचेकडून प्रतिमहिना रु. ७०००/– मासिक भत्ता मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. तिचे म्हणण्यानुसार, अर्जदार हिसध्या तिचे माहेरी राहत असून तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्याचप्रमाणे अर्जदारचे माहेरची परीस्थिती देखील गरीबीची आहे. अर्जदार हिची आई ही वयोवृध्द असल्याने तिचा आईला सांभाळावे लागत आहे. तसेच अर्जदार ही सामनेवाले यांच्या मानसिक शारीरीक त्रासामुळे व छळामुळे सतत ब्लडप्रेशर व थायरॉईड ने त्रस्त झाली असून त्याकरीता औषधोपचार करणेस तिची आर्थिक परीस्थिती नाही. अर्जदार ही माहेर आले नंतर सामनेवाले क्र. १ याने कोणतेही अर्जदारचे पालनपोषणाचे त्याचे कर्तव्य पार पाडलेले नाही. सामनेवाले क्र. १ याची आर्थिक स्थिती चांगली असून त्याला स्वतःला दरमहा रु.५५,०००/– ते ६०,०००/– एवढा पगार मिळतो. सामनेवाले क्र. ३ ही मुंबई येथील मोठया हॉस्पीटल येथे नर्सचे काम करत असून तिला रु.३०,०००/– एवढा पगार आहे. सबब, प्रस्तूत अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यंत दरम्यानचे कालावधीत अर्जदाराला स्वतःच्या उदरनिर्वाह, औषधोपचार व गरजेच्या गोष्टीकरीता सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिला प्रति महिना ७,०००/– अंतरीम मासिक भत्ता दयावा अशी विनंती तिने केली आहे.

३. सामनेवाला क्र. १ यांनी नि.क्र. १३ वर आपले म्हणणे सादर केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, अर्जदार व सामनेवाले क्र. १ यांच्या लग्नाला दोन ते तीन महिने झाल्यानंतर अर्जदार हिने तिचा खरा व मुळ स्वभाव सामनेवाले यांना दाखवायला सुरुवात

केली. परंतू सामनेवाले क्र. १ याने अर्जदार हिच्या सदर वर्तणुकीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन अर्जदार हिस व्यवस्थित नांदविण्याचे चालूच ठेवले. अर्जदार हि सामनेवाले क्र. १ यांच्या घरातील भांडयाची आदळआपट करणे, घरात विनाकारण कर्कश आवाज काढून भांडण करणे, घरातील शांतता बिघडण्याचा हेतूत: प्रयत्न करणे, विनाकारण भांडणतंटा उकरून काढणे, सामनेवाले क्र. १ यांचया मुलींशी विनाकारण भांडणतंटा करुन त्यांना शिवीगाळ करणे, असे करुन सामनेवाले क्र. १ याचे जीवन जगणे असहय करुन टाकले. सामनेवाले क्र. १ याने अर्जदार हिचेशी सामोपचराने प्रकरण मिटवणेचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरविले. सामनेवाले क्र. १ याच्यावर सामनेवाले क्र. २ व ३ या त्याच्या मुलींची जबाबदारी आहे. सामनेवाले क्र. २ व ३ या शिक्षण घेत आहेत. अर्जदार हिची माहेरची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. सामनेवाले क्र. १ हे अर्जदार हिस पत्नी या नात्याने नांदवावयास तयार होता व आजही आहे. सामनेवाले क्र. १ याला उच्च रक्तदाब, मधुमेह सारखे आजार असून देखील तो अर्जदार हिची संपूर्ण काळजी घेत बसं. सन २०१८ मध्ये सामनेवाले क्र.१ ने अर्जदार हिस नवीन दुचाकी देखील घेवून दिली. अर्जदार हिने सामनेवाले क्र. १ याचेसोबत फक्त आर्थिक लुट करणेकरीताच त्याचेशी लग्न केल्याचे दिसून येते. अर्जदार हिच्या बेधुंद व बेताल वागण्याने सामनेवाला क्र. १ ते ३ व त्याच्या घरच्यांना मानसिक व शारीरीक त्रास झाला आहे. सबब सदर अर्ज फेटाळून लावणेत यावा अशी विनंती प्रस्तूत सामनेवाला क्र. १ याने केली आहे.

४. अर्जदार तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. युक्तीवादावरुन व कथनांवरुन खालील मुद्दे निष्पन्न झाले व त्यावरील निष्कर्ष पुढील कारणांसह नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांना सामनेवाले याने घरगुती हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते काय ? | होकारार्थी |
| २. | अर्जदार ही सामनेवाला याचेकडून मागणी करते त्याप्रमाणे अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? जर होय तर कोणत्या मासिक दराने ? | अंशत: होकारार्थी<br>प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार हिस दरमहा २०००/– रु |
| ३. | आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

५. मी याठिकाणी अधिनियमाच्या कलम २३ मधील तरतुदी नमुद करु इच्छीतो. या कलमाच्या पोटकलम १ नुसार या अधिनियमाखाली कोणत्याही कारवाईच्या वेळी दंडाधिकारी यांना जे योग्य वाटेल असा तो अंतरिम आदेश पारीत करु शकतील आणि पोटकलम २ नुसार जेंव्हा अर्जावरुन जाबदार याने घरगुती हिंसाचार केल्याचे किंवा करत असल्याचे किंवा करण्याची शक्यता असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन आले असल्यास दंडाधिकारी अधिनियमाचे कलम १८ ते २२ नुसारचे अनुतोष एकतर्फा आदेशाने पारीत करु शकतील. म्हणजेच सदरहु अधिनियमाचे आदेशाच्यावेळी सत्यतेची प्रत (**standard of proof**) सकृतदर्शनी केस (**Prima facie case**) पाहिली पाहिजे.

६. अर्जदार हिने तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तिला तिच्या दैनंदिन उदरनिर्वाहाकरिता कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही, ती तीचे आईकडे रहात आहे, असे कथन केले आहे.

७. याउलट सामनेवाला यांनी अर्जदार हिची आर्थिक परीस्थिती चांगली आहे असे सांगितले आहे. परंतू तिला उदरनिर्वाहाचे साधन आहे किंवा नाही याबाबत त्यांनी कोणतेही कथन केलेले नाही. याउलट त्यांनी आपल्या कथनामध्ये असे सांगितले आहे की, तिला कोणत्याही ठिकाणी नोकरी उपलब्ध होऊ शकते. यावरुन तिच्याकडे उत्पन्नाचे साधन नाही हे शाबित होते. पत्नीच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी ही पतीवर असते. सामनेवाला हा अर्जदारचा पती असल्याबद्दलचे संबंध अर्जदार व सामनेवाला यांना मान्य आहे. अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. सामनेवाला हा आरोग्य विभागात आरोग्य सहाय्यक या पदावर काम करत असून त्याला दरमहा र.रु.५५,०००/– ते ६०,०००/– पगार मिळत असल्याचे अर्जदाराचे कथन आहे. अर्जदार यांनी सदर कथनास अनुसरुन नि.क्र. १२ सोबत अर्जदार यांचे ओळखपत्राची छायांकित प्रत सादर केली आहे. परंतु त्यांना ५५,०००/– ते ६०,०००/– पगार मिळत असल्याबाबतचा कोणताही पुरावा पटलावर आलेला नाही. जरी सामनेवाला यांच्या उत्पन्नाचा पुरावा पटलावर आला नसला, तरीही तो अपंग आहे किंवा त्याला काही शारिरीक विधी आहेत हे कुठेही दिसून येत नाही. तसेच सामनेवाला क्र. १ हा आरोग्य विभागात आरोग्य सहायक असल्याचे नि.क्र. ४ वरील जोडलेल्या ओळखपत्राच्या छायांकित प्रतीवरुन दिसून येते. यावरुनच सामनेवाला हा महिन्याला काम करुन अर्जदाराची व त्यांच्या मुलीची खर्चांची जबाबदारी घेऊ शकतो. सामनेवाला यांनी अर्जदारांना आर्थिक मदत न केलेस त्यांना उदरनिर्वाह करणे कठीण होईल. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २०/०१/२०२० रोजी दाखल केलेला आहे. अर्ज दाखल केलेपासून सामनेवाला यांनी अर्जदारांना काहीही आर्थिक मदत केलेबाबत प्रथम दर्शनी

पुरावा पटलावर आलेला नाही. **उदरनिर्वाहाकरिता आर्थिक मदत न करणे हा देखील कौटुंबिक हिंसाचार आहे.** त्यामुळे प्रथम दर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे दिसून येते. त्यामुळे यापुढेही कौटुंबिक हिंसाचार होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत मूळ अर्जाचा निकाल लागेपर्यत अर्जदार यांना उदरनिर्वाहाकरिता त्यांचा आर्थिक खर्च विचारात घेता दरमहा प्रत्येकी र.रु.२०००/- देणे योग्य व उचित होईल. यास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदार हिचा नि.क्र. ५ वरील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणाच्या अंतिम निकालापर्यत सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदार हिस तिच्या उदरनिर्वाहाकरिता मूळ अर्ज दाखल तारखेपासून प्रत्येकी दरमहा रुपये २०००/- मासिक भत्ता दयावा असा आदेश पारीत करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/-
(बी. आर. पाटील)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, देवगड

स्थळ : देवगड
दिनांक: २६/१०/२०२१